माहितीचा अधिकार

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग

# सहसंचालक, लेखा व कोषागारे पुणे विभाग पुणे

**लेखा कोष भवन, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे -४११ ००१**

Email - jd.pune@mahakosh.in
दूरध्वनी क्रमांक : ०२०-२६१२४९५९
blog- http://jdatpune.blogspot.in
०२०-२६१२१२१४/१५

वाचा : १. वित्त विभाग, शासन अधिसूचना क्र. सेवाप्र -११.०७/प्र.क्र.१९६/१ व २ कोषा (प्रशा-३), दि. ०२.१२.२००८.

२. संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांची दि. ०९.०१.२०१९ रोजीची जाहिरात.

३. संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांचे पत्र क्र.संलेको/प्रशा-कोषा/कार्या-५/ प्र.क्र. २३०३/ २०१९/६१३, दि.०६.०७.२०१९.

४. या कार्यालयाचे पत्र क्र. सहसंलेको/पुणे/आस्था-४/ले.लि.क.ले./नवीन भरती/२०१८-१९/२०१९/१४०६, दि.२०.०७.२०१९.

५. संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांचे पत्र क्र. संलेको/प्रशा-कोषा/कार्या-५/ प्र.क्र. २३०३/ २०१९/ ६६५, दि. २२.०७.२०१९.

६. या कार्यालयाचे पत्र क्र. सहसंलेको/पुणे/आस्था-४/ले.लि.क.ले/भाग-१/नियुक्ती शिफारस/२०१९/१५६५(१२), दि.३१.०७.२०१९.

७. या कार्यालयाचे पत्र क्र. सहसंलेको/पुणे/आस्था-४/ले.लि.क.ले/नवीन भरती/२०१८-१९/२०१९/१५७७(१४), दि.०१.०८.२०१९.

८. विभागीय उपआयुक्त, महिला व बाल विकास विभाग, पुणे विभाग पुणे यांचे पत्र क्र. विउआपुविपु/आस्था/३०% म.आ/प्रमाणपत्र/२०१९-२०/१२८२, दि.२०.०९.२०१९.

क्र.सहसंलेको/पुणे/आस्था-४/ले.लि.क.ले./नवीन भरती/नि.आदेश/२०१९/२०११ दिनांक : 20 SEP 2019

## : आदेश :

संदर्भ क्र. १ च्या शासन अधिसूचनेद्वारे सहसंचालक, लेखा व कोषागारे गट- क सेवा (सेवाप्रवेश) नियम २००८ हे नवीन सेवाप्रवेश नियम लागू झाले आहेत. संचालनालय, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कार्यालयाच्या स्तरावरुन **लेखा लिपिक** या विभागीय संवर्गातील रिक्त पदे भरण्यासाठी संदर्भ क्र.२ अन्वये जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली होती. त्या जाहिरातीच्या अनुषंगाने उमेदवारांची Online लेखी परीक्षा दि.२८.२.२०१९ ते ०७.०३.२०१९ या कालावधीत आयोजित करण्यात आलेली होती. त्याअनुषंगाने प्राप्त झालेल्या निकालपत्राच्या आधारे तयार करण्यात आलेल्या तात्पुरत्या विचाराधीन उमेदवारांच्या यादीमधून खालील उमेदवाराची कागदपत्रे पडताळणी अंती गुणानुक्रमे निवड झाली आहे.

आपली **खुला-महिला राखीव** या प्रवर्गातून निवड झालेली असल्यामुळे या कार्यालयाचे संदर्भ क्र.७ च्या पत्रान्वये नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्राची सत्यता पडताळणी होऊन तसा अहवाल मिळणेबाबत विभागीय उपआयुक्त, महिला व बाल विकास, पुणे विभाग पुणे यांना कळविण्यात आले आहे. विभागीय उपआयुक्त, महिला व बाल विकास, पुणे विभाग, पुणे यांनी त्यांचे संदर्भ क्र.८ च्या पत्रान्वये आपली निवड ही खुल्या प्रवर्गातून झाली असल्याने आपण उन्नत व्यक्ती गट (क्रिमीलेअर) मध्ये मोडत नसल्याचा अहवाल या कार्यालयास सादर केला आहे.

त्यानुसार उमेदवाराची लेखा लिपीक पदावर सुधारित वेतन संरचनेतील वेतन बँड रुपये **५२००-२०२०० ग्रेड वेतन रुपये १९०० व सातव्या वेतन आयोगातील मॅट्रीक स्तर S-६ व वेतन संरचना १९९००-६३२००** या वेतनश्रेणीत जाहिरातीत नमूद केलेल्या व खाली दर्शविलेल्या अटी व शर्तींच्या अधिन राहून **तात्पुरत्या स्वरुपात** नियुक्ती देण्यात येत आहे:

| अ. क्र. | उमेदवाराचे नाव व पत्ता | नियुक्तीचे पदनाम | मूळ जात प्रवर्ग | नियुक्तीचा प्रवर्ग | पदस्थापना दिलेल्या कार्यालयाचे नाव व पत्ता |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्रीम.स्नेहल अशोक माने,<br>मु.पो- वडणगे- आंबेवाडी<br>ता- करवीर<br>जि-कोल्हापूर- ४१६२२९ | लेखा लिपिक | एसईबीसी | खुला-महिला राखीव | कोषागार कार्यालय सांगली. जि. सांगली |

१. **सदरची नियुक्ती सामान्य प्रशासन विभागाचे दि.०४.०७.२०१८ च्या पत्रान्वये दिलेल्या सूचनांनुसार, जनहित याचिका क्रमांक १७५/२०१८ व इतर प्रकरणामधील मा. मुंबई उच्च न्यायालयाचे दि.२७.०६.२०१९ च्या निकालाच्या अधीन राहून करण्यात येत आहे. सदर नियुक्तीबाबत काही तांत्रिक मुद्दा उपस्थित झाल्यास/ आक्षेप आल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता संबंधित उमेदवाराची नियुक्ती रद्द करण्यात येईल.**

२. उपरोक्त उमेदवारास संचालनालय, लेखा व कोषागारे गट-क सेवाप्रवेश नियम २००८ व त्यात वेळोवळी होणाऱ्या सुधारणा तसेच त्या संदर्भात शासन निर्णयाद्वारे दिल्या जाणाऱ्या सूचना यांच्या अधिन राहून नियुक्ती देण्यात येत आहे.

३. महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार, पात्र उमेदवारांना ज्या महसुली विभागात नियुक्ती देण्यात येईल, त्या ठिकाणी त्यांना **सहा वर्षे (दोन पदावधी)** सेवा केल्याशिवाय ते विभाग बदलीस पात्र ठरणार नाहीत.

४. त्यांची अस्थायी नियुक्ती लेखा लिपिक या एकत्रित संवर्गात केलेली असल्यामुळे या एकत्रित संवर्गातील कोणत्याही पदावर ते बदलीस पात्र राहतील.

५. कार्यालय अथवा लेखा परीक्षणाच्या कामासाठी विहीत केलेली फिरती अनिवार्य राहील, याची नोंद घ्यावी.

६. संबंधित उमेदवारांनी कोकण/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर यापैकी ज्या विभागाकडे अर्ज केले असतील, त्या विभागातील सहसंचालक, लेखा व कोषागारे विभागांतर्गत अधिनस्त कोषागार, उपकोषागार कार्यालय येथील रिक्त पदांच्या उपलब्धतेनुसार नियुक्ती देण्यात येत आहे. सा.प्र.वि,शासन निर्णय,क्र.एसआरव्ही-२०१८/व्हीआयपी ६७/प्र.क्र.२०७/कार्या-१२ दि.२८.०५.२०१८ नुसार संबंधित उमेदवार यांनी त्यांचे नियुक्तीच्या पदावर नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून ३० दिवसांचे आत रूजू होणे आवश्यक राहील. उमेदवाराकडून देण्यात येणाऱ्या कोणत्याही कारणांचा/ विनंतीचा विचार केला जाणार नाही. **विहित मुदतीत हजर न झाल्यास त्यांना ही पदस्थापना स्वीकारण्यात स्वारस्य नाही असे समजून नियुक्तीचे आदेश तात्काळ रद्द करण्यात येतील. याबाबत वरील शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येईल.**

७. सेवेत हजर होण्यासाठी उमेदवारांना जो खर्च करावा लागेल त्या खर्चाची प्रतिपूर्ती शासनाकडून केली जाणार नाही. सदर खर्च उमेदवारांना स्वत:ला करावा लागेल.

२३. सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र. स्थाप्रप-१४१४/ (प्र.क्र.१३/१४)/१३-अ, दि. ११.०९.२०१४ मधील तरतुदीनुसार अस्थायी शासकीय कर्मचाऱ्यांना प्रथम नियुक्तीच्या पदावर ३ वर्षांची नियमित सेवा पूर्ण झाल्यानंतर स्थायित्व प्रमाणपत्र प्राप्त करून घेण्याच्या दृष्टीने आवश्यक त्या सर्व अटींची/ बाबींची पूर्तता करणे बंधनकारक राहील.

२४. नियुक्ती स्वीकारल्यानंतर संबंधित उमेदवारांस संबंधित पदाचे पायाभूत प्रशिक्षण पूर्ण करणे अनिवार्य राहील. सदर प्रशिक्षण संबंधित विभागातील विभागीय प्रशिक्षण केंद्रामध्ये आयोजित करण्यात येईल. तसेच सदर प्रशिक्षण कालावधीत कोणतीही रजा देय असणार नाही.

२५ आपणास वित्त विभाग, मुंबई अधिसूचना दि.०३.०३.२०१२ अन्वये लेखा लिपीक पदासाठी विहीत केलेली परीक्षा नियुक्तीच्या दिनांकापासून अनुक्रमे तीन सलग संधीमध्ये परीक्षेचा भाग-१ उत्तीर्ण होणे अनिवार्य (Compulsory) राहील.

२६. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.एसआरव्ही-१०९२/१०३३/प्र.क्र.३३/९२१/८ दिनांक ०२.१२.११९७ मधील तरतूदीनुसार उमेदवारांना उपरोक्त नियुक्ती समाप्त करावयाची इच्छा असल्यास त्यांनी कार्यालयास एक महिन्याच्या पूर्वसूचनेसह राजीनामा द्यावा लागेल अथवा राजीनाम्यासोबत एक महिन्याचे मूळ वेतन शासनाकडे भरावे लागेल.

२७. संबंधित उमेदवार ज्या कार्यालयात हजर होतील त्या कार्यालय प्रमुखांना सदरहू आदेशातील अनुक्रमांक ९,१०,११,१२,१३,१४,१५,१६,१७,१८,१९,२०,२१ व २२ मधील अटींची पूर्तता संबंधित उमेदवारांकडून तात्काळ करुन घेवून त्याची नोंद त्यांच्या सेवापुस्तकात घेवून तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

(शु.अ.पाटोळे)
**सहसंचालक, लेखा व कोषागारे,**
**पुणे विभाग पुणे**

**प्रति,**

श्रीम.स्नेहल अशोक माने,
मु.पो- वडणगे- आंबेवाडी
ता- करवीर
जि-कोल्हापूर- ४१६२२९

**प्रत :** १) मा. संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहितीस्तव.

२) कोषागार अधिकारी, सांगली
/- यांनी श्रीम.स्नेहल अशोक माने रुजू होताच त्याबाबतचा रुजु अहवाल तात्काळ या कार्यालयास सादर करावा.

३) वैयक्तिक नस्ती / निवडनस्ती.